संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# स्वावलंबी मुख्यमंत्र्यांची परावलंबी विधाने

**महाराष्ट्र** हे इतके सुधारणावादी राज्य असेल याची कोणालाही कल्पना आली नाही. कारण महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी अशी काही ग्वाही दिली आहे की आता महाराष्ट्राने पावसावर अवलंबून राहाणे आता कमी केलेले आहे. गेल्या वर्षीसुध्दा पावसावर अवलंबून न राहाता जलतळी, जलशिवार , जलप्रवाह यासारख्या योजना राबवून पाण्याचा अधिकाधिक वापर केला. पाऊस कमी पडूनही महाराष्ट्राची उत्पादकता कायम राहिल्याचे सांगून मुख्यमंत्र्यांनी स्वतःची पाठ थोपटून घेतली. आणि यंदादेखील पावसाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे राहाणार नाही हे लक्षात घेऊन पावसाच्या पाण्याची अधिकाधिक साठवण केली जाईल. थोडक्यात मुख्यमंत्र्यांना असे सांगायचे आहे की पाऊस पडो ना पडो तरी महाराष्ट्राची पाणी समस्या अन्य मार्गाने सोडवण्यासाठी राज्य सरकार स्वतःची अफाट आणि अचाट कल्पनाशक्ती वापरत आहे. त्याला भरपूर यश येत आहे. पाऊस कमी जरी पडला तरी महाराष्ट्राने त्याची आता फिकीर करू नये. राज्य सरकारने अन्य पर्यायी योजना आखलेल्या आहेत. आणि त्या योजनांमधून राज्याचा पाणीप्रश्न सोडवला जाऊ शकतो. दुष्काळाची फार चिंता करण्याचेही कारण नाही. असा प्रचंड आशावाद मुख्यमंत्र्यांनी जागवला आहे त्यांच्या या आशावादाला तितकाच भरभक्कम पाठिंबा देण्याचे काम केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. यावेळचा दुष्काळ हा महाराष्ट्रातला शेवटचा दुष्काळ असेल इतके निसर्गालाही आश्चर्यचकित करणारे भाकित गडकरी यांनी केलेले आहे. अर्थात इच्छाशक्ती असेल तर या सगळ्या गोष्टी घडून येऊ शकतात. परंतु नुसती इच्छाशक्ती असूनही भागत नाही. तर उपलब्ध झालेल्या पैशाचा योजनाबध्दरीतीने वापर करणे तितकेच गरजेचे असते. भारतात आजच्या क्षणालातरी असे कोणतेही सरकार नाही की जे सरकारी पैशाचा अतिशय योजनाबध्द उपयोग करू शकेल उलट उपलब्ध असलेल्या पैशाचा योजनाबध्द अपहार करण्याची क्षमता प्रत्येक राज्य सरकार दाखवू शकते. म्हणूनच महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी पावसावर अवलंबून राहाणे महाराष्ट्राने कमी केले आहे अशा प्रकारची जी वल्गना केली त्याचे त्यांनीच एकदा आत्मपरीक्षण करावे.स्वावलंबी मुख्यमंत्र्यांची ही परावलंबी विधाने असेच त्याचे वर्णन करावे लागेल.

### पावसाचाही तसा आग्रह नाही

मुख्यमंत्र्यांनी यासाठीच आत्मपरीक्षण केले पाहिजे की त्यांच्या या विधानाचे दोन अर्थ होतात. एक म्हणजे आतापर्यंत राज्य सरकार पावसावर अवलंबून राहात होते. पाऊस चांगला झाला तर महाराष्ट्राचे नशीब चांगले आहे असे म्हणता येते. आणि पाऊस कमी झाला तर ती निसर्गाची अवकृपा आहे असे जाहीर करून आपली सुटकाही करून घेता येते. मात्र महाराष्ट्राच्या निर्मितीला साठ पासष्ट वर्षे होत असताना हे कृषीप्रधान राज्य आतापर्यंत पावसावर अवलंबून राहिले. म्हणून त्याचे तितकेच अपरिमित नुकसान झाले. पण पावसावर अवलंबून राहायचे नाही म्हणजे नेमके काय करायचे याची तितकीच कृतीशील योजना सरकारकडे नाही. केवळ जलयुक्तशिवार किंवा शेततळी उभारून पाण्याची समस्या सुटेल अशा भाबड्या श्रध्देमध्ये राहाण्यात काही अर्थ नाही. राज्य सरकारने आतापर्यंत गेल्या चाळीस वर्षात राज्याच्या जलसंधारणावर जो काही खर्च केला त्याच्यावर एक श्वेतपत्र प्रसिध्द करावे. काही लाख कोटींचा खर्च जलसंधारणावर झाला. आणि त्या खर्चाचे गुणोत्तर काढताना किती हेक्टर जमीन ओलिताखाली आली याचा हिशेब सरकारने द्यावा म्हणजे मग पावसावर अवलंबून न राहाणे हा प्रकार काय असतो याचा सरकारलाच उलगडा होईल. गेल्या चाळीस वर्षात किमान चार लाख कोटींचा खर्च जलसंधारणावर झाला. आणि फक्त अठरा टक्के जमीन ओलिताखाली आणता आली हा प्रकार म्हणजे राज्याच्या जलधोरणाचे अक्षम्य असे अपयश आहे. एवढ्या मोठ्या रकमेमध्ये एखादे नर्मदा सरोवर किंवा भाक्रा नांगलसारखे धरणही उभे राहिले असते. एवढेच नव्हे तर या रकमेचा गावपातळीवर पाणीसाठवणीसाठी उपयोग केला असता तर निदान राज्यातील ५० हजार खेडी आज टंचाईमुक्त राहिली असती. पावसावर अवलंबून राहायचे नाही पण पावसाचे पाणी अडवून ठेवण्यासाठी काही करायचे नाही. अशी ही दुटप्पीपणाची स्वार्थी राजकीय भूमिका आहे. प्रत्यक्ष निसर्ग किंवा पाऊससुध्दा आपल्यावर कोणी अवलंबून राहावे अशी अपेक्षासुध्दा ठेवत नाही परंतु निसर्गाच्या स्वभावाप्रमाणे ज्या काही गोष्टी घडत जातात त्याचा योग्य तो सन्मान मनुष्याने किंवा समाजाने करावा. एवढीच त्याची अपेक्षा असते.

### तर ती भाषा अधिक विधायक

धो धो पडणारा पाऊस काही दिवसांनी वाहून जातो. पाण्याची साठवण किंबहुना पाणी जमीनीत मुरवण्याची कोणतीही शास्त्रीय पध्दत सरकारला अवलंबता आलेली नाही. महाराष्ट्रात नाशिक हा एकमेव असा जिल्हा आहे की तिथे राज्यातील सर्वाधिक धरणे बांधली गेली. परंतु आज निम्मे नाशिक जिल्हा हा दुष्काळाच्या तडाख्यात सापडत असतो. तिथेसुध्दा पावसाने माझ्यावर अवलंबून राहा असे काही सांगितलेले नव्हते पण ज्यांच्या भरोशावर किंवा अभ्यासानुसार ही धरणे बांधली गेली तिथेसुध्दा पाण्याची साठवण होत नसेल तर ही धरणे पैसे चरण्यासाठी उभारलेली कुरणे होती हे स्पष्ट होते. पावसावर अवलंबून न राहात राज्याची उत्पादकता वाढते हा जावईशोधही मुख्यमंत्र्यांनी लावला आहे. सलग दोन वर्षे महाराष्ट्रात दुष्काळाचा तडाखा बसतो आहे राज्यातील शेती उत्पादन कमी झालेले आहे. केवळ सरकारी आकडेवारीची फुशारकी न मारता गावोगाव शेतकऱ्यांची काय परिस्थिती आहे याचे सर्वेक्षण सरकारने करावे. म्हणजे मग कोणती उत्पादकता वाढली आणि कोणती कमी झाली याचा उलगडा सरकारला होईल. या सर्व परिस्थितीचा विचार केला तर पावसावर अवलंबून राहाण्याची भाषा न करता पावसाच्या पाण्याचा आदर करण्याची सन्मान करण्याची आणि या पावसाच्या पाण्याच्या थेंबाथेंबासाठी सरकारचा एकेक पैसा सत्कारणी लावण्याची भाषा झाली असती तर ती जास्त विधायक ठरली असती.